साप्ताहिक

# परळी परिसर

✲ परळी वैजनाथ ✲ शुक्रवार, दि. १० मे २०२४ ✲ पाने-४ ✲ २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे ‘बळ’, आण्णांची ‘फिल्डींग’ महायुतीची बाजू भक्कम करणारी..!



**परळी वैजनाथ, (लक्ष्मण वाकडे):- येत्या १३ मे ला होणाऱ्या व सर्वांचे लक्ष लागलेल्या बीड लोकसभेच्या निवडणुकीत येथील महायुतीच्या उमेदवार व भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांना परळी विधानसभा मतदार संघात येथील विद्यमान आमदार व पालकमंत्री धनंजय मुंडे यांची ताकद मिळाल्याने आणि ताई मोठ्या मताधिक्याने निवडून याव्यात म्हणून राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते वाल्मिकआण्णा कराड यांनी लावलेल्या ‘फिल्डींग’ मुळे या मतदार संघात महायुतीची बाजू भक्कम झाली आहे.**



महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना येथून मताधिक्य देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) ज्येष्ठ नेत्या सुदामतीताई गुट्टे, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, युवक नेते बबनभाऊ गित्ते, काँग्रेसचे बहादूरभाई यांच्यासह आघाडीतील विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते घेत असलेल्या परिश्रमामुळे श्री सोनवणे यांचीही येथे चांगलीच हवा झाली आहे.

गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे परळी मतदार संघात भाजप बॅकफूटवर गेला होता तर राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेल्या यशामुळे या पक्षाचा गड अधिकच भक्कम झाला होता. गेल्या चार वर्षात या मतदार आमदार व विद्यमान पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलेली विकासकामे, कार्यकर्त्यांचे पाठबळ श्री मुंडे यांना मानणारा इथला मतदार यामुळे राष्ट्रवादीची ताकद येथे वाढतच गेली. त्यामुळे गेल्या काही वर्षात झालेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, बाजार समितीसह इतर विविध निवडणुकीत राष्ट्रवादीला एका मागून एक यश मिळत गेल्याने परळी विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून राज्यभर ओळखला जाऊ लागला.

राज्यातील सत्तेचे समिकरण बदलल्याने विविध पक्षाची, गटाची महायुती होऊन राज्यात सत्ता स्थापन झाली. या महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), रिपाई व इतर पक्ष एकत्र आले. यामुळे राज्यातील राजकारणाची दिशा बदलली. एकमेकांचे विरोधक मित्र झाले. परळीतही पंकजाताई व धनंजय मुंडे भावंडातील वैर संपले. या परिस्थितीत लोकसभेच्या निवडणुका आल्या. या निवडणुकीत भाजपने बीड लोकसभा मतदार संघात ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांना महायुतीतर्फे उमेदवारी दिली. त्यामुळे महायुतीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व इतरांवर पंकजाताईंना येथून निवडून आणण्याची जबाबदारी पडली. बीड लोकसभेची निवडणूक महायुतीने प्रतिष्ठेची केली. जिल्ह्यातील सहा आमदार, विद्यमान खासदार महायुतीकडे आहेत. महायुतीची ताकदही मोठी आहे. यामुळे या निवडणुकीत महायुतीला यश मिळवणे फारसे अवघड नाही असे सुरूवातीला वाटत होते. परंतु या निवडणुकीत विकासासापेक्षा जातीय राजकारण अधिक तीव्र झाल्याने निवडणुकीत चुरस वाढत गेली. महायुती व युतीतील घटक पक्ष यांच्यासाठीही ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली. त्यामुळे इतर नेत्यांबरोबरच पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी आपली सर्व ताकद लावली आहे. ताईंच्या विजयासाठी भाऊ जिवाचे रान करतो आहे. ते रात्रंदिवस घेत असलेली मेहनत व ज्येष्ठ नेते वाल्मिकआण्णा कराड यांनी लावलेली जोरदार ‘फिल्डींग’ पंकजाताईंची बाजू भक्कम करणारी ठरली आहे. परळी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादीची ताकद महायुतीच्या बाजूने उभी झाल्याने या मतदार संघातून पंकजाताईंना मताधिक्य मिळणे शक्य होईल असे चित्र आहे.

दरम्यान महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांना मिळत असलेला पाठींबा यामुळे तुतारी ही येथे विविध भागात वाजू लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या सभेनंतर येथील राजकारण ढवळून निघाले आहे. या निवडणुकीत महायुतीचे ‘कमळ’ फुलते की महाविकास आघाडीची ‘तुतारी’ वाजते याकडे सर्वांच लक्ष लागले आहे. ✲✲✲

## बीड जिल्ह्याच्या विकासाचे चित्र बदलण्यासाठी बजरंग सोनवणे यांना साथ द्या - शरद पवार



अंबाजोगाई (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्याचे चित्र बदलण्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना विजयी करुन देशात नवा इतिहास निर्माण करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी अंबाजोगाईतील जाहीरसभेत बोलताना केले.

बीड लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहरातील मोंढा मैदानावर गुरुवारी (ता.९) सायंकाळी झालेल्या सभेत श्री पवार बोलत होते. या व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार रजनीताई पाटील, आमदार संदीप क्षीरसागर, माजीमंत्री अनिल देशमुख, जयसिंग गायकवाड, महेबुब पटेल, प्रा.सुशिला मोराळे, फौजिया खान, राधाकृष्ण होके पाटील, उमेदवार बजरंग सोनवणे, पृथ्वीराज साठे, सय्यद सलीम, राजेंद्र जगताप, फुलचंद्रराव कराड, आशाताई भिसे, डॉ.नरेंद्र काळे, सुदामतीताई गुट्टे, बबनभाऊ गित्ते, भगवानराव शिंदे, राजेसाहेब देशमुख, सुरेश तात्या पाटील, बब्रुवान पोटभरे, बन्सी जोगदंड, अमर देशमुख, रत्नाकर शिंदे, बाळासाहेब शेटे, यांच्यासह इंडिया आघाडी पक्षातील अनेक मान्यवर उपस्थित होते. श्री पवार पुढे म्हणाले की, आजच्या सभेतील उत्साहाचे वातावरण पाहुन या निवडणुकीच्या निकालाचे चित्र स्पष्ट दिसतो आहे. ही सभा बजरंग सोनवणे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे. या निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानाच्या नंतर निकालाचे चित्र स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निवडणुकीच्या कालावधीत केलेली भाषणे ही हास्यास्पद झाली आहेत. पंतप्रधान म्हणून देशाच्या विकासाचे आणि एकात्मतेचे जे चित्र उभे करायला पाहिजे ते चित्र उभे करण्यात मोदी सपशेल अपयशी ठरले आहेत असे सांगून श्री पवार यांनी देशासमोरील प्रश्न सोडविण्यासाठी भाजपाला सत्तेपासून दुर ठेवा असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार रजनीताई पाटील, माजीमंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, आ.संदीप क्षीरसागर, ॲड.अजय बुरांडे, श्री धांडे, फुलचंद्रराव कराड, सुदामतीताई गुट्टे, श्री वाघमोडे, श्री साठे यांच्याह बजरंग सोनवणे आदींची भाषणे झाली. ✲✲✲

## लोकसभेच्या निवडणुकीची परळीत तयारी पूर्ण; सोमवारी मतदान

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येत्या सोमवारी (ता.१३) होणाऱ्या बीड लोकसभेच्या निवडणुकीची परळीत तयारी पूर्ण झाली असून रविवारी (ता.१२) मतदान साहित्य घेवून कर्मचारी मतदान केंद्रावर मुक्कामी जाणार आहेत.

बीड लोकसभेसाठी ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रमुख लढत महायुतीच्या पंकजाताई मुंडे व महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे अशोक हिंगे यांच्यात आहे. सोमवारी सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत मतदान होणार आहे. यासाठी परळी शहरात ८२, तालुक्यात २४२ तर मतदार संघात ३४२ मतदान केंद्र आहेत. एकूण दीड हजार कर्मचारी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष कामास असणार तर तेवढेच कर्मचारी सहकार्य करणार आहेत. ४५० एवढ्या पोलिस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त आहे. तर सी.ए.पी.एफ.९० कमांडोची तुकडी तैनात केली जाणार आहे. मतदार संघात एकूण मतदार ३ लाख २६ हजार ३७४ एवढे आहेत. त्यात स्त्री मतदार १ लाख ५५ हजार २७७ तर पुरुष मतदार १ लाख ७१ हजार ९४ आहेत. या निवडणुकीची तयारी येथे पूर्ण झाली असून येथील उपविभागीय कार्यालयात मतदान यंत्राची तपासणी करून सिलबंद करण्याचे कामही पूर्ण झाले आहे. केंद्रनिहाय मतदान साहित्याच्या बॅगाही भरुन ठेवल्या गेल्या आहेत. रविवारी मतदान केंद्रावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र व इतर साहित्य दिले जाणार आहे. हे कर्मचारी रविवारीच मतदान केंद्रावर मुक्कामी असणार आहेत. सोमवारी सकाळी सात वाजल्यापासून प्रत्यक्ष मतदानाला सुरूवात होणार असून सायंकाळ सहापर्यंत मतदान चालणार आहे. मतदान झाल्यानंतर मतदान यंत्र व इतर साहित्य तहसील कार्यालयात कर्मचाऱ्यांनी जमा केल्यानंतर सोमवारी रात्रीच ते बीडकडे पाठविले जाणार आहेत. दरम्यान, मतदानाला येताना मतदारांनी आपल्या ओळखीचा पुरावा सोबत घेवून यावा असे आवाहन करण्यात आले आहे. ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी व शांततेत पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर व त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत. ✲✲✲

# परळी येथील ईव्हीएम कार्यान्वित प्रक्रियेची जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केली पाहणी

बीड, (जि.मा.का.):- बीड लोकसभा मतदारसंघात मतदान सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून यासाठीची जय्यत तयारी सुरू आहे. सहा विधानसभांमधील मतदान केंद्रानुसार सरमिसळ झालेली असून आता या मशीनचे कमिशनिंग म्हणजेच बॅलेट युनिटमध्ये बॅलेट पेपर लावणे, कंट्रोल युनिट तपासणे आणि व्हीव्हीपॅट कागदाचे रोल तसेच त्याची तपासणी करून सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परळी येथील होत असलेल्या कमिशनिंगच्या ठिकाणी मंगळवारी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परळी विधानसभेचे सहायक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर व परळीचे तहसिलदार व्यंकटेश मुंडे , नायब तहसिलदार मिलींद गायकवाड, बाबुराव रुपनर, अन्ना वंजारे हे ईव्हीम प्रक्रिया पाहणी करते वेळी सोबत उपस्थित होते. परळी येथे एकुण ३४२ मतदान केंद्राकरिता ३५ टेबलावर सिलींग प्रक्रिया करण्यात आली.



या प्रसंगी बीड जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काही ईव्हीम सिलींगबाबत महत्त्वाच्या सूचना करताना सुरक्षात्मक उपायांबद्दल माहिती दिली. तसेच यावेळी १००० मॉक पोल करिता ५ टक्के या नुसार १८ मतदान केंद्र चिठ्ठ्या राजकीय पक्ष प्रतिनीधीचे उपस्थितीत काढण्यात आल्या. कमिशनिंग नंतर स्ट्राँग रुम मध्ये मशीन सील करून ठेवण्यात येणार आहेत . सिलींग केलेल्या मशीन्स दिनांक १२ मे २०२४ रोजी मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षासह पाठवण्यात येतील. दिनांक १३ मे रोजी मतदान सुरू होण्याच्या दीड तासापूर्वी उमेदवार यांचे मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष अभिरुप मतदान घेऊन निवडणूक आयोगाने सांगितलेल्या प्रक्रियेनुसार ईव्हीम मशीनद्वारे प्रत्यक्ष मतदानाला सकाळी ०७ .०० वाजता सुरुवात होईल. ईव्हीएम मशीनसला हाताळण्याचे तांत्रिक प्रशिक्षण सर्व पथकांना व मतदान अधिकारी यांना दिलेले असून त्याप्रमाणे मतदान सुरळीत पार पडण्यासाठी सर्व आवश्यक व योग्य ती कार्यवाही मतदान दिनांक १३ मे २०२४ रोजी करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना केल्या. ***

# ११७७ मतदान केंद्रावर असणार 'तिसरा डोळा'



बीड (जिमाका):- बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून यासाठी २३५५ मतदान केंद्रे तयार आहेत. मतदान केंद्रावर काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी यापैकी ५००/० टक्के असे ११७७ मतदान केंद्राचे थेट प्रक्षेपण म्हणजेच वेब कास्टिंग होणार आहे.

बीड लोकसभा मतदारसंघात येणा-या विधानसभा मतदार संघात अनुक्रमे गेवराई-१९९, माजलगाव-१८९, बीड-१९१, आष्टी-२२०, केज-२०७ आणि परळी-१७१ असे एकुण ११७७ मतदान केंद्रावर वेब कास्टींग होणार आहे या विधानसभा मतदारसंघात काही मतदान केंद्र हे संवेदनशील गटात मोडत असून अशा ठिकाणी वेब कास्टिंग ची सुविधा असणार आहे.

यासह निश्चित झालेल्या ठिकाणी थेट प्रक्षेपणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सकाळी ५:३० वाजेपासून वाजेपासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वेब कास्टिंग होणार आहे. वेब कास्टिंगचे थेट प्रक्षेपण त्या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात नियंत्रण असणार आहे. तर एकूण सहाही विधानसभा मतदार संघाचे थेट प्रक्षेपण हे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या कक्षात दिसणार आहे. वेब कास्टिंग यंत्रणेद्वारे काही अनुचित प्रकार लक्षात आल्यास कायदा सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्या सताक्काळ त्या मतदान केंद्रावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल.

# 'दिलखुलास' कार्यक्रमात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांची शुक्रवारी मुलाखत

मुंबई, (जि.मा.का.):- 'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज' याविषयी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत घेण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात, शुक्रवार १० मे २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर



सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत ही मुलाखत प्रसारित होणार आहे. पत्रकार अतुल कुलकर्णी यांनी ही मुलाखत घेतली आहे. बीड जिल्ह्यात असलेले लोकसभा निवडणूक मतदार संघ, लोकसभा निवडणुकीचे कामकाज पार पडण्यासाठी सुरू असलेली कार्यवाही, मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रांवर करण्यात आलेली तयारी, मतदार जनजागृती उपक्रम, कायदा व सुव्यवस्थेबाबतचे नियोजन, सर्व घटकातील मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधा याबाबत बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी या मुलाखतीत माहिती दिली आहे. ***

# अक्षय तृतीयेच्या दिवशी बालविवाह होण्याची शक्यता; आढळल्यास गुन्हा दाखल होईल

बीड, (जिमाका): अक्षय तृतीया या दिवशी मोठ्या प्रमाणात बाल विवाह आयोजित होत असतात. जे कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपुर्ण राज्यात लागू आहे. त्यानुसार बाल विवाह आयोजित करणे हा अजीमपात्र गुन्हा आहे.



अक्षय तृतीया या दिवशी बाल विवाह होवू नये म्हणून आवश्यक त्या उपाय योजना शासना करीत आहे. बाल विवाह हि प्रथा बाल हक्काच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे बाल विवाह बेकायदा ठरतात. या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षीत आहे. तसेच सदर कायद्याच्या अमलबजावणी संदर्भात महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने यंत्रणानी / विभागाने / कार्यालय यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात (ग्राम / तालुका व जिल्हास्तरावर) बाल विवाह होवू नये यासाठी जाणिव जागृती कार्यक्रम, प्रशिक्षण, रॅली, इ. प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात. बाल विवाहाचे आयोजन करणारे वधु व वर यांचे आई वडिल, नातेवाईक, भटजी, मंडपवाले, आचारी, व-हाडी मंडळी या सर्वावर गुन्हा नोंदविण्यात येईल. या बाबतची दंवडी सर्व गावात, सर्व ग्रामपंचायतीनी द्यावी तसेच दंवडी बाबतचा अहवाल गटविकास अधिकारी कार्यालयात सादर करावा.

संरपंच, पोलीस पाटील व ग्रामसेवक यांना अक्षय तृतीया या दिवशी आपआपल्या गावी उपस्थित रहावे, बाल विवाह होत असल्याचे लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड हेल्प लाईन क्रं. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्यात यावी यासह संबंधित पोलीस स्टेशनला माहिती देण्यात यावी. अक्षय तृतीया या दिवशी जिल्ह्यात बाल विवाह होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या आदेशाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय धानोरा रोड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स ता.जि.बीड या ठिकाणी संपर्क करण्यात यावा.Email-dwcdbee @gmail.com

# मतदानाच्या दिवशी सोमवारचा आठवडी बाजार बंद; जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आदेश

बीड, (जिमाका):- निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान शांततेत पार पडावे यासाठी सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील ज्या गावी, ठिकाणी आठवडी बाजार भरतात ते बंद राहतील, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी, दीपा मुधोळ मुंडे यांनी निर्गमित केलेले आहेत.

मतदानाच्या पार्श्वभूमीवर मार्केट अँड फेअर ॲक्ट १८६२ चे कलम ५ व कलम ५ (अ) मधील तरतुदीनुसार पणन संचालक, यांनी आठवडी बाजार बंद ठेवण्यास परवानगी दिली. त्या आधारे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आदेश काढून मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद ठेवण्यास तसेच ते अन्य दिवशी भरवण्यास मान्यता दिली आहे.

बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाच्या महत्त्वाच्या तालुक्याच्या ठिकाणी आठवडी बाजार भरविण्यात येतात. यामध्ये बीड तालुक्यातील कुक्कडगाव, पारगाव सि. या ठिकाणचे बाजार, गेवराई तालुक्यातील शेकटा, लुखामसला, सिरसमार्ग, खांडवी या ठिकाणचे बाजार, शिरूर कासार तालुक्यातील बाजार तळ शिरूर कासार, फुलसांगवी या ठिकाणचे आठवडी बाजार, पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील बाजार, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ पुंडी, पांगरा, धामणगाव येथील बाजार, माजलगाव तालुक्यातील राजेगाव हा बाजार, धारूर तालुक्यातील धारूर चा बाजार, वडवणी तालुक्यातील पिंपळा रुई, देवळा बु., चिखलबीड येथील बाजार, केज तालुक्यातील बोरीसावरगाव, मस्साजोग येथील बाजार आणि परळी वैजनाथ तालुक्यातील परळी वैजनाथ येथील बाजार सोमवारी भरत असून ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान असल्याकारणाने हे आठवडी बाजार बंद ठेवण्यात आलेले आहेत. ***

# विभागीय उपआयुक्त यांची परळीला भेट

परळी वैजनाथ, (बातमीदार):- ३९ बीड लोकसभा मतदार संघाकरिता १३ मे रोजी मतदान होणार असून या अनुषंगाने विभागीय प्रशासन देखील केलेल्या नियोजनाचा आढावा घेत असून गुरुवार दि ९ रोजी विभागीय उप आयुक्तांनी परळी मतदार संघातील विविध मतदान केंद्राला भेटी देत तेथील सुविधेचा आढावा घेतला.

बीड लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान संपन्न होणार आहे या अनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोल-मुंडे यांनी वेळोवेळी परळी विधानसभा मतदार संघातील लोकसभेचा नियोजनाचा आढावा घेत विविध मतदान केंद्राला भेटी दिल्या.याच पार्श्वभूमीवर गुरुवार दि ९ रोजी औरंगाबाद (छ.संभाजी नगर) विभागाच्या उप आयुक्त डॉ.सीमा जगताप यांनी आपल्या पथकासह परळी मतदार संघातील सिरसाळा व इतर मतदान केंद्राला भेटी देत तेथील उपलब्ध असलेल्या सुविधेचा आढावा घेतला. उप आयुक्त डॉ.सीमा जगताप यांच्या या भेटी दरम्यान परळी तहसीलचे नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, मंडळ अधिकारी मंगल मुंडे, तलाठी एरंडे यांच्यासह बीएलओ आदी उपस्थित होते.यावेळी डॉ.जगताप यांनी उपलब्ध असलेल्या सुविधा पाहून समाधान व्यक्त करत आवश्यक त्या सूचना प्रशासनास केल्या.*

# शिष्यवृत्ती परीक्षेत दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे घवघवीत यश

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता ५ वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (युपीसी) परीक्षा आणि इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (पी एस एस) परीक्षा १८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये घेण्यात आली.

सदर शिष्यवृत्ती परीक्षेत दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे ज्यामध्ये इयत्ता पाचवी तील ५१ पैकी १५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत तर इयत्ता २७ पैकी ९ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. शिष्यवृत्ती परिक्षेत यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.ऊषा किरण गित्ते तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव नगरविकास सार्वजनिक बांधकाम उद्योग पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील यांनी केले. ***

संपादकीय...

# आठव्या वर्षात पदार्पण करताना...

**–० सुविचार ०–**
माझी सगळ्यांना गरज आहे हा भ्रम आणि मला कुणाचीच गरज नाही अहंकार डोक्यातून काढून टाकला म्हणजे माणूस सर्वांच्या जीवाभावाचा होतो.

परळी शहराला पत्रकारितेची मोठी परंपरा आहे. विविध वर्तमानपत्र आज येथून नियमित प्रकाशित होतात. जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बीड नंतर परळीतून प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्राची संख्या अधिक आहे. राजकारणासह धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, व्यापार अशा विविध क्षेत्रात आघाडीवर असलेल्या परळीचे नाव या ना त्या कारणाने प्रसार माध्यमातून सतत चर्चेत असते. इथल्या घडामोडी सर्वत्र व वाचकांपर्यंत पोहंचवण्यात येथून प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्रांची, पत्रकारांची भूमिका मोठी व महत्वाची आहे. त्यामुळे इथल्या घडामोडी बरोबरच पत्रकारिता, वर्तमानपत्रांचीही चर्चा होते.

समाज संपर्क माध्यमांचा (सोशल मिडिया) वाढत्या प्रभावामुळे वर्तमानपत्रांना आज मोठी कसरत करावी लागत आहे. सोशल मिडियाद्वारे वाचकांना ताजी बातमी झटपट देण्याची स्पर्धा सुरू आहे. अनेक वर्तमानत्रांनीही वाचकांपर्यंत ताज्या बातम्या देण्यासाठी पोर्टल, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप सुरू केले आहेत. शिवाय अनेकांनी वेबपेजही काढली आहेत. त्यास वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे. यामुळे वाचकांना झटपट ताज्या बातम्या व घडामोडीची माहिती होत आहे.

सर्वसाधारण वाचकांना सोशलमिडियामुळे अगोदरच बातम्या समजत असल्याने वर्तमानपत्र स्टॉलवर जाऊन विकत घेणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. असे असले तरी वर्तमानपत्र घेऊन येणाऱ्या वितरकाची वाट बघणारे कितीतरी जण आहेत. वर्तमानपत्र वाचल्याशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. या आणि अशा शेकडो प्रेम करणाऱ्या वाचकांमुळेच वर्तमानपत्रांचे अस्तित्व यामुळेच टिकून आहे.

वर्तमानपत्रांपुढे समाज संपर्क माध्यमाबरोबरच महागाईने आज मोठे आव्हान उभे केले आहे. वर्तमानपत्र छापण्यासाठी लागणारा कागद, शाई व इतर बाबींची भरमसाठ झालेली भाववाढ तसेच वर्तमानपत्र तयार करण्यासाठी, वितरणासाठी लागणाऱ्या मनुष्यबळावर होणारा खर्च वाढल्याने आज वर्तमानत्र काढणे मोठे अवघड होऊन बसले आहे. जाहिराती हा वर्तमानपत्रांचा महत्वाचा कणा, परंतु जाहिरातीचे प्रमाण घटत चालले आहे. जाहिरातदारांची ओढही सोशलमिडियाकडेच आहे. खर्च अधिक व उत्पन्न कमी अशी अवस्था सध्या वर्तमानपत्रांची झाली आहे. त्यात छोट्या व लघु वर्तमानपत्राची अवस्था तर खुपच वाईट आहे. अनेक वर्तमानपत्र सलाईनवर असल्यासारखी जगत आहेत.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळख असलेल्या प्रसार माध्यमाच्या या घटकाला सरकारचे म्हणावे तसे पाठबळ नाही. जाचक अटी लाऊन वर्तमानपत्रांना सरकारी नियमाच्या फेऱ्यात अडकवले जात आहे. त्यामुळे सरकारचे सहकार्य मिळणे ही वर्तमानपत्रांच्या दृष्टीने दूरवरची गोष्ट होऊन बसली आहे. अशा परिस्थितीत मागच्या सात वर्षापासून परळी वैजनाथ, जि.बीड येथून साप्ताहिक 'परळी परिसर' हे साप्ताहिक आम्ही नियमितपणे प्रकाशित करत आहोत. वाचकांचा मिळणारा मोठा प्रतिसाद, जाहिरातदार, विक्रेते व इतरांचे मिळणारे सहकार्य या बळावर अंक प्रकाशनाचे आमचे सातत्य कायम आहे. प्रत्येक अंक दर्जेदार, वाचनीय करून तो वाचकांच्या हाती देण्याचा आमचा प्रयत्न असतो. प्रत्येक अंकाचे आपण वाचक स्वागत करता. अंकाबाबतच्या प्रतिक्रियाही नोंदवता याचा आम्हाला अभिमान वाटतो. आज 'परळी परिसर' आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. यापुढेही आपले असेच सहकार्य आम्हाला कायम मिळत रहावे ही सदिच्छा.! ***

# मानवता धर्माचे उद्धारक महात्मा बसवेश्वर...

महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकात एक महान मानवतावादी , समतावादी संदेश देणारे एक संत होऊन गेले ,पण त्यांचे समग्र साहित्य,संदेश प्रामुख्याने कन्नड भाषेत असल्याने व त्यांची शिकवण विशेषकरून कर्नाटकातील संप्रदायांमध्येच प्रसारित झाल्याने एवढ्या मोठ्या महात्म्याचे देशभर, तसेच जगात म्हणावे तसे योग्य मूल्यमापन झालेले नाही.म. बसवेश्वरांचे आयुष्य केवळ ३५ वर्षांचे होते. एवढ्या कमी काळात ज्ञानसाधना करून विषमता, कर्मकांड ,अंधश्रद्धेच्या विरोधी आणि समानतेचा आवाज बुलंद करीत विविध जाती धर्मातील लाखो स्त्री, पुरुष, पददलितांना, शोषितांना मुख्य धारेत आणणे ही त्या काळातील महान क्रांतीच होती.

बसवेश्वरांनी स्त्रियांना त्याकाळी बरोबरीने अधिकार प्रदान केले होते .महिलांना प्रतिनिधित्व मिळाल्यानेच त्यांच्या धर्म कार्याला सामर्थ्य प्राप्त झाले . त्यांनी त्याकाळी बालविवाहाला विरोध केला, पण विधवा विवाहाला मान्यता दिली .एवढेच नव्हे तर, त्यांनी आठशे वर्षांपूर्वीच आंतरजातीय विवाहाचा श्री गणेशा अनुभव मंडपातून केला. याला विशेष महत्त्व प्राप्त होऊन त्यामुळे रक्त क्रांती ही झाली होती. त्यावेळी शिवशरण स्त्रिया देखील समाजकार्यात अग्रेसर होत्या .त्यांच्या पत्नी राणी गंगाबिकादेवी यांनी तर बहुजन स्त्रियांसाठी उद्योग केंद्रे व साक्षरता केंद्रे सुरू केली होती. बसवेश्वरांच्या धर्मकार्यात अनेक स्त्रियांचे मोलाचे योगदान आहे. बसवेश्वरांनी त्यावेळच्या समाजाचे निरीक्षण केले.अंधश्रद्धा त्यांना जाणवली त्यावर त्यांनी कडक प्रहार केले अज्ञानी लोकांच्या स्थितीचे वर्णन करताना ते म्हणतात की, अज्ञानी लोक बकर्याला बळी देतात. तो बकरा बळी जाण्यापूर्वी सजावटीच्या तोरणाचे पान खाण्यात मग्न असतो .नंतर थोड्याच वेळात त्याच्या त्याचा बळी जातो. तद्वतच पामर व अज्ञानी जिवांचा बळी घेणारे लोक तरी वाचतील काय? देवी देवता त्यांना वाचवतील काय? लोक दगडी नागाला दूध पाजतात: पण नाग जिवंत दिसला की त्याला हातात काठी घेऊन ठार मारतात. भुकेल्या व्यक्तीस हाकलून देतात व दगडाला नैवेद्य दाखवितात ही मूर्खता होय. अस्पृश्य व दलितोद्धाराचा स्वयंपूर्ण सर्वांग सुंदर आणि सर्वश्रेष्ठ असा विचार त्यांनी मोठ्या धाडसाने ८०० वर्षांपूर्वी मांडला .दलित प्रेम हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग होते आणि त्याच तत्त्वासाठी त्यांनी प्रधानमंत्री पदाचा त्याग केला, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अनेक संत महात्म्यांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रातच मंगळवेढा येथे बसवेश्वरांच्या कार्याचा पहिला प्रारंभ



झाला. त्यांनी बौद्ध, इस्लाम, जैन इ.अनेक धर्मांचा सखोल अभ्यास केला आणि सतत चिंतनातून हिंदू धर्मातील चातुर्यवर्ण ,भेदाभेद, अस्पृश्यता ,अनेक देवतावाद, स्त्री अत्याचार इत्यादी गोष्टींवर प्रहार केल्याशिवाय मानवता नांदू शकणार नाही, माणूस माणसाच्या जवळ येऊ शकणार नाही ,तो सुखी समृद्ध होऊ शकणार नाही, असे त्यांना वाटू लागले म्हणून त्यांनी त्या दिशेने आपल्या जीवनाची वाटचाल प्रत्यक्ष आचरणातून केली. महात्मा बसवेश्वराचा जन्म इसवी सन ११३२ मध्ये कर्नाटकात विजापूर जिल्ह्यातील बसवंत बागेवाडी येथे वै.शु.अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर नंदीव्रत धारी माता मादलांबिका व पिता मादरस यांच्या पोटी झाला शैव कुळात झाला.महात्मा बसवेश्वर हे भारतीय विभूती पुरुषांच्या मालिकेत तेजाने चमकणारा तारा आहे ,श्रेष्ठ समाज विज्ञान, अर्थशास्त्रज्ञ आणि धार्मिक नेता असलेले श्री. महात्मा बसवेश्वर हे विचारवादाला माणुसकीची पूर्ण दृष्टी दिलेले महापुरुष आहेत. माणसाची योग्यता ही त्याच्या जातीवरून नसून गुणवत्तेवर आहे. हा क्रांतिकारी विचार बाराव्या शतकात सांगून जातीची निरर्थकता त्यांनी पटवून दिली. समाज आणि धर्माबद्दल मधील दुरावा नष्ट करून त्यामध्ये समानता घडवून आणली, विचार आणि आचार या दोन्हींना एक करून सर्व जीवांच्या उद्धारासाठी प्रयत्न केलेल्या महात्मा बसवेश्वराने युगप्रवर्तक शक्ती होऊन वीरशैव लिंगायत धर्माचा आणि मानवता धर्माचा उद्धार केला .तुम्हाला काही होता येईल, पण महात्मा बसवेश्वर होता येणार नाही हे त्या काळातील शिवशरणांचे मत महात्मा बसवेश्वराचे मोठेपणा दाखवून देते. महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वानुसार दया हेच वीरशैव लिंगायत धर्माचे मूळ तत्व आहे. शास्त्र हे धर्माचे हत्यार नव्हे, धर्मयुद्धाला केव्हाही अवकाश देत नाही .सर्व धर्मातील चांगल्या चांगल्या विचारप्रवाहांचा संगम महात्मा बसवेश्वरांच्या विचारात झाल्याने ते विचार विश्वधर्मांचे रूप धारण करता किंवा धर्म समन्वयाची भावना जोपासण्यासाठी त्यांनी आपल्या तत्त्वांना दिलेला आकार त्यांच्या विश्वप्रज्ञेची साक्ष आहे.

समग्र क्रांतीच्या कल्पनेला जगामध्ये पहिल्यांदा आकार दिलेला आणि आपल्या क्रांतीला आपणच तोंड देऊन त्यामध्ये लीन झालेल्या महात्मा बसवेश्वर हा पहिला महापुरुष आहे. एक जात, एक देव, समानता, बंधुत्व आणि व्यक्ती स्वातंत्र्य हे सर्व त्यांच्या समग्र क्रांतीची पायाभूत तत्वे आहेत. सामाजिक, धार्मिक क्रांतीमुळे हे सर्व साध्य होते, म्हणून त्यांनी अस्पृश्यता आणि जातीयता निर्मूलनासाठी एकदेव उपासनेला महत्त्व दिले. समाज आणि देशाच्या ऐक्यासाठी इष्टलिंग उपासनेला महत्त्व दिले.

दारिद्र्याचे निर्मूलन आणि उत्पन्नाचे समान वाटप करून माणुसकीची वैज्ञानिक पद्धत अंमलात आणली सर्वोदयाला योग्य असे वातावरण निर्माण केले. महात्मा बसवेश्वरांनी सांगितलेल्या मार्गाचे अनुकरण केले तर जगामध्ये शांती, दया ,सुख आणि बंधुत्व नांदू शकेल. साहित्याने सामाजिक क्रांती होऊ शकते हे महात्मा बसवेश्वरांनी दाखवून दिले. समाजमनाची नांगरणी करून सदविचाराचे बीज पेरण्याचे कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले. महात्मा बसवेश्वरांच्या जीवन चरित्राची, आदर्शाची, शाश्वत चिरंतन मूल्यांची व शिकवणुकीची संपूर्ण समाजाला व देशाला आज नितांत गरज आहे, अशा महान क्रांतिकारक बसवेश्वर जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

**– प्रा.स्वाती संतोष सरडे (खके)**
जामखेड

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com




# स्व.गोपीनाथ मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बेटी पंकजाला दिल्लीत पाठवा-पंतप्रधान नरेंद्र मोदी

**अंबाजोगाई (बातमीदार):- स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी बेटी पंकजाला दिल्लीत पाठवा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंबाजोगाई येथील जाहिर सभेतून केले.**

बीड लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीरसभा अंबाजोगाई येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर मंगळवारी (ता.७) सायंकाळी झाली. यावेळी श्री मोदी बोलत होते. सभेला हजारोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. सभेच्या व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीयमंत्री रामदास आठवले, कृषीमंत्री धनंजय मुंडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आमदार प्रकाशदादा सोळंके, लक्ष्मण पवार, नमिता मुंदडा, सुरेश धस, बाळासाहेब आजबे, रमेशराव आडसकर यांच्यासह महायुतीतील विविध पक्षाचे नेते, जिल्हाध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरूवात श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग, श्री योगेश्वरी देवी, संत भगवानबाबा, संत नारायण महाराज यांना नमन करुन केली. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्याही आठवणींना त्यांनी उजाळा देऊन त्यांची उणिव भासत असल्याची खंत व्यक्त केली. इंडिया आघाडीचा अजेंडा हा केवळ मिशन कॅन्सल आहे. आम्ही राबवलेल्या विविध योजना आणि घेतलेले निर्णय रद्द करण्यासाठी ते मत मागत आहेत असे श्री मोदी म्हणाले. कर्नाटकात मुस्लीमांना ओबीसीच्या कोट्यातून रातोरात आरक्षण दिले गेले आहे. आरक्षण अडचणीत आणण्याचे काम काँग्रेस करत आहे परंतु आपण जिवंत असे पर्यंत दलित, आदिवासी, ओबीसी वंचितांचे आरक्षण कोणालाही हिसकावून घेवू देणार नाही अशी ग्वाही श्री मोदी यांनी यावेळी दिली. सिंचन योजनेअंतर्गत राज्यातील २७ प्रकल्प निवडले असून त्यातील काही पूर्ण झाले आहेत. यामुळे मराठवाडा पाण्याच्या संकटातून मुक्त होईल असा विश्वास श्री मोदी यांनी व्यक्त केला. सुरत-येडशी महामार्ग, आष्टी-बीड-परळी रेल्वे मार्ग विकासाच्या मार्गावर आहे असेही ते म्हणाले. ओबीसीला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण दिले व ते कोर्टात टिकणारे दिले असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावळी बोलताना सांगितले. ही निवडणूक बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आहे, इथल्या उसतोड कामगारांच्या मुलांच्या हातातील कोयता आम्हाला काढून घ्यायचा आहे, तुमचे मतरुपी आशीर्वाद मला द्या असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. तर केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी देशाचे संविधान कुणीही बदलू शकणार नाही असे सांगून या निवडणुकीत पंकजाताईंना साथ द्या असे आवाहन केले.

## घाटनांदूर वरून अंबाजोगाई रेल्वे मार्गाला जोडली जावी-ना.धनंजय मुंडे

बीड जिल्ह्यात जवळपास सात लाखापेक्षा अधिक हेक्टर शेती ही जिरायती आहे. गोदावरीचे १६५ टीएमसी तुटीचे खोरे भरून काढण्याच्या प्रकल्पास महायुती सरकारने तत्वतः मान्यता दिलेली आहे. हे तुटीचे खोरे भरून काढल्यास बीड जिल्ह्याला किमान ४२ टीएमसी इतके पाणी मिळेल. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्याने बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती ही बागायती होणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजे प्रस्तावित खर्च एक लाख १७ हजार कोटी इतका असून, राज्य व केंद्र सरकारच्या एकत्रित अर्थसहाय्य याचबरोबर अन्य बँकांच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प पूर्ण करायचा आहे. त्यासाठी मोदींजींची विकासाची गॅरंटी पंकजाताई जिल्ह्यासाठी पूर्ण करू शकते, असा विश्वास कृषिमंत्री



तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अंबाजोगाई येथे आयोजित विजयी संकल्प सभेत धनंजय मुंडे बोलत होते. सभेला उपस्थित विराट जनसमुदाय पाहून ही सभा विजयाचा संकल्प करणारी नाही तर पंकजाताईच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. बीड जिल्ह्याच्या नावापुढे लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्ह्यातील शेती जलयुक्त करणे, उस तोडणाऱ्या हातांना ऊस उत्पादक बनवणे, इथल्या लोकांना इथेच रोजगार मिळवून देणे, हे आमचे ध्येय असून, यासाठी पंकजाताईला संसदेत पाठवणे आवश्यक आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. दरम्यान बीड जिल्ह्यात रस्ते व रेल्वेचे काम वेगाने सुरू असून, अंबाजोगाईला देखील घाटनांदूर वरून रेल्वेला जोडण्याची आमची अनेक वर्षांची मागणी सुद्धा आगामी काळात पंकजाताई या मोदींजींच्या नेतृत्वात पूर्ण करतील, अशी अपेक्षाही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. ***

## महत्त्व अक्षयतृतीयेचे...

हिंदू संस्कृतीत सण सोहळ्यांना फार महत्व प्राप्त झाले आहे. हे सण साजरे करण्याच्या पाठीमागे काही ना काही तरी इतिहास असतोच. हिंदू संस्कृती उच्च संस्कृती मानली जाते. त्या संस्कृतीच्या विचारानुसार मनुष्यजन्म प्राप्त होणे म्हणजे जन्म-मरणाच्या चक्रातून कायमची सुटका करून घेण्याची ही एक संधी असते. मनुष्य जन्माला आल्यानंतर आपल्या जीवनाचं सोनं करण्याची ही संधी असते. नाहीतर पुन्हा तो जीव त्याच त्या फेऱ्यांत अडकत राहतो. अक्षय तृतीया या दिवसाचे महत्त्व म्हणजे या दिवशी भुकेलेल्यांना, तहानलेल्यांना पाणी देणे. वस्त्रहीन व्यक्तीला वस्त्रदान केल्यास आपल्या गाठीशी पुण्य जमा होते. अक्षय म्हणजे क्षय न होणारे, अक्षय रहाणारे होय. त्यामुळे या सणादिवशी दानधर्म करण्याला फार महत्त्व आहे. खऱ्या अर्थाने कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. कोणाविषयी कृतज्ञता तर पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांच्या महतीसाठी. या देहाला त्यांच्यामुळेच सर्वकाही मिळाल्याने महत्त्व प्राप्त झाले आहे, चैतन्य मिळाले आहे. तसेच कृतज्ञता व्यक्त व्हावी पितरांविषयी. त्यांच्यामुळे आपल्याला मनुष्याचा जन्म मिळालेला आहे.



अक्षय तृतीयेच्या दिवशी पितरांच्या स्मरणार्थ अन्नदान, जलदान, वस्त्रदान करण्यात येते. वैशाख महिन्याच्या शुद्ध तृतीयेला अक्षय तृतीया साजरी करण्यात येते. या दिवशी निसर्गाचे दर्शनदेखील फार विलोभनीय असते. कारण चैत्र पालवीचा हा ऋतु. वसंताचे आगमन झालेले असते आणि वृक्ष लतिकांवरची जुनी पाने गळून आता त्या ठिकाणी कोवळी पोपटी पाने उगवलेली असतात. सर्व झाडांना नवीन फुलोरा फुललेला दिसतो. निसर्ग चैतन्याने भारून गेलेला असतो. सर्व परिसर विविध फुलांच्या, आंब्याच्या मोहराच्या गंधाने दरवळुन गेलेला असतो. पक्षी देखील आनंदाने चिवचिवत असतात कारण त्यांना खायला कोवळा चारा मिळालेला असतो. झाडांच्या पानांतून लपायला, फांद्यांच्या बेचक्यात घरटी बनवायला त्यांना जागा मिळालेली असते.

फुलपाखरे, मधमाशा, भ्रमर यांना फुलांमधील मकरंद शोषून घेण्यासाठी चांगली संधी असते. झाडांना करडा तपकिरी रंग प्राप्त झाल्यामुळे पक्षांना लपायला जागा मिळते. आमराईमध्ये लगडलेल्या कैर्या खाण्यासाठी विविध प्रकारचे पक्षी किलबिलाट करत आम्रवृक्षांवर रूंजी घालताना दिसतात. बुलबुल, दयाळ, पोपट, फळांनी लगडलेल्या फांद्यांवर बसलेली दिसतात. कोकिळा सुरेल आवाजात गाणे गात असते.कोवळी तृणपाती तरारून उठलेली दिसतात. रानफुले गंधाळून गेलेली असतात. सर्वत्र निरनिराळ्या गंधांनी भारित झालेला हा परिसर मोठा मनोहारी दिसतो. अवघी सृष्टी उन्हांत भाजून निघालेली असते आणि त्या घामेजलेल्या शरीराला थंडावा मिळण्यासाठी वृक्षाखाली छायेत झोपण्याचे सुख किती सुखकारक!

त्याप्रमाणे आपल्या संस्कृतीत साडेतीन मुहुर्तातला हा अर्धा मुहूर्त मानला जातो. या दिवशी नवीन वास्तू, वाहन, वस्तू, व्यवसाय आरंभ शुभकार्य, सामाजिक कार्य केल्यास हमखास यश मिळते असे मानले जाते. यादिवशी लोक हमखास सोन्याची खरेदी करतात. धार्मिक रीतिरिवाजानुसार अक्षय तृतीयेच्या दिवशी आपल्या दिवंगत आई,वडील, आजी, आजोबा, आप्तस्वकीय, पूर्वज यांच्या स्मरणार्थ ब्राह्मणांना जलकुंभ दान करतात. बऱ्याच लोकांना या दिवशी काम करण्याची संधी असते. वैशाख महिन्यात सर्वत्र गुऱ्हाळे जोरात चालू असतात. त्यामुळे उसाचा रस पिण्यासाठी सर्वत्र झुंबड दिसते. अक्षय तृतीया संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केली जाते.विदर्भात या दिवसाला विशेष महत्त्व आहे. पितरांच्या स्मृतिप्रित्यर्थ घराघरातून अन्नदान केले जाते.

या दिवशी नैवेद्याला पुरणपोळी, चिंचेचे सार, कानवले, आंब्याची डाळ, कवठाची चटणी, पन्हे, डाळवडे, भात वरण, भाजी भजे असा साग्रसंगीत बेत असतो. न पितरांना खाऊ घालणे म्हणजे कावळ्यांना खाऊ घालणे असे समजले जाते.त्यावेळी कराची पूजा केली जाते.

या दिवशी नागरी नांगराची पूजा करून शेतीच्या कामांना नांगरणीला सुरुवात करण्यात येते. म्हणजेच चांगल्या कामाची सुरुवात या दिवशी होते. निसर्ग, इतर पशुपक्षी, शेती यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण हा सण मोठ्या आनंदाने साजरा करतो.

**- सौ.भारती सावंत,** मुंबई